■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८४ ■ बुधवार दि.२ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 284 ■ Wednesday Dt.2 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागरांच्या सांगण्यावरूनच विजयसिंह बाळा बांगर पत्रकार परिषद घेऊन बोलक्या पोपटा सारखा का बोलु लागला?

## विजयसिंह बाळा बांगरने दलित समाजाचा उपयोग करून जातीय तेढ निर्माण करण्याचा डाव? याप्रकरणी कारवाई होणार का?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## सहा महिने मुग गिळून गप्प बसणाऱ्या विजयसिंह बाळा बांगर यांनी आजच पत्रकार परिषद घेऊन वाल्मीक कराडवर कोणाच्या इशाऱ्यावर आरोप केले?

# एसपी साहेब आपण सांगितलं होतं की वादग्रस्त रेकॉर्डिंग आणि व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांवर कारवाई करणार मग विजयसिंह बाळा बांगरवर गुन्हा दाखल होणार का?

## विजयसिंह उर्फ बाळा बांगरला इतक्या उशिरा दलित समाजावर अन्याय होत आहे हे का समजले?

- वाल्मीक कराड आणि विजयसिंह बाळा बांगर ची दुश्मनी जगजाहीर आहे त्यामध्ये दलित समाजाचा आधार बांगरने घेऊ नये?
- संबंधित दलित समाजाच्या व्हायरल रेकॉर्डिंग क्लिप ही मीडियाला आजच का दिली, विजयसिंह बाळा बांगरने उत्तर द्यावं?
- अल्पवयीन विद्यार्थिनीवरील अत्याचार प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आवाज उठवल्यानंतरच बाळा बांगरला जाग का आली?

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच देशमुख हत्या प्रकरणात बीडच्या कारागृहात असलेल्या वाल्मिक कराडचे जुने सहकारी विजयसिंह बाळा बांगर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन वाल्मीक कराड यांच्या विरोधात धक्कादायक खुलासे केले आहेत. वाल्मीक कराडला धनंजय मुंडे यांचे पीए प्रशांत जोशी यांना देखील मारायचे होते असा आरोप विजयसिंह बाळा बांगर यांनी पत्रकार परिषद घेऊन केले आहे. तसेच यावेळी बोलताना त्यांनी वाल्मीक कराड वर अनेक आरोप केले आहेत. या आरोपामुळे एकच खळबळ उडाली आहे. तसेच वाल्मीक कराडांची एक कॉल रेकॉर्डिंग देखील त्यांनी पत्रकार परिषद मध्ये व्हायरल केली आहे. विजयसिंह बाळा बांगर यांनी आमदार सुरेश धस आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्या सांगण्यावरूनच पत्रकार परिषद घेऊन वाल्मीक कराड वर आरोप केले असल्याची चर्चा सध्या ऐकायला मिळत आहे. विजयसिंह बाळा बांगर यांनी दोन जातीत तेढ निर्माण करत असल्याचे देखील बोलले जात आहे.







पत्रकार परिषद मध्ये विजयसिंह बाळा बांगर यांनी जी कॉल रेकॉर्डिंग व्हायरल केली त्या कॉल रेकॉर्डिंग चा वापर स्वत:च्या स्वार्थापोटी विजयसिंह बाळा बांगर हे करत असल्याचे देखील सांगितले जात आहे. दलित समाजावर अन्याय होत आहे हे विजयसिंह बांगर यांना उशिरा का समजले असे अनेक प्रश्न सध्या नागरिकांकडून उपस्थित केले जात आहे. वाल्मीक कराड आणि विजयसिंह बाळा बांगर यांची दुश्मनी जग जाहीर आहे त्यामध्ये दलित समाजाला विजयसिंह बाळा बांगर यांनी ओढू नये, तसेच त्यांनी आज जी पत्रकार परिषद घेऊन वाल्मीक कराड वर आरोप केले हे कोणाच्या इशारावर केले आणि संबंधित दलित समाजाच्या व्हायरल रेकॉर्डिंग क्लिप मिडियाला आजच का दिली हे विजयसिंह बाळा बांगर यांनी जाहीरपणे उत्तर द्यावे. आमदार सुरेश धस आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्या सांगण्यावरूनच विजयसिंह बाळा बांगर यांनी पत्रकार परिषद घेतली आहे अशी बीड शहरात जोरदार चर्चा सुरू आहे. आत्तापर्यंत विजयसिंह बाळा बांगर गप्प का होते. शहरातील एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याप्रकरणी धनंजय मुंडे यांनी आवाज उठवल्यानंतरच विजयसिंह बाळा बांगरला जाग का आली असा प्रश्न उपस्थित होत आहे. बांगरने दलित समाजात व वंजारी समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. दोन जातीत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न विजयसिंह बाळा बांगर यांनी करू नये, पोलीस

पान २ वर





## हातभट्टीची दारु तयार करुन तिचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्मुल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत विविध हेड खाली बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण. यांनी दिनांक ३१.०५.२०२५ रोजी इसम नामे ईब्बु काशीम नुरीवाले वय ३४ वर्षे रा. गवळीपुरा अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे हातभट्टीची दारू तयार करणे, ताब्यात बाळगणे, चोरटी विक्री करणे, हातभट्टीच्या दारुची वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०७ गुन्हे न्यायप्रविष्ट असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहेत. सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुची निर्मीती व चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुची चोरटी वाहतुक व व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा जोमाने हातभट्टीची दारू ताब्यात बाळगुन

पान २ वर

## अल्पवयीन विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणातील विजय पवार विरोधात आणखी एका पालकाची तक्रार

बीड । प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून गुंडगिरी आणि गुन्हेगारीच्या मुद्द्यावरुन चर्चेत असलेल्या बीडमध्ये दररोज नवनवे प्रकार समोर येत आहेत. कधी मारहाण, कधी दहशत पसरवण्याचा प्रकार, कधी रिल्स, तर कधी बँकेच्या फसवणुकीमुळे कर्जबाजारीमुळे

पान २ वर

### दोन वर्षापासून शिक्षक विभागाकडे पाठपुरावा, पण कारवाई नाही

माझ्या मुलीलाही शाळेबाहेर उभा करायचे. तर कधी केबिनमध्ये बोलावून बॅडटच करायचा, असा आरोप या पालकांनी विजय पवारवर केलाय. या सर्व प्रकरणात कारवाई व्हावी यासाठी संबंधित पालकाने गेल्या दोन वर्षापासून शिक्षक विभागाकडे पाठपुरावा केला. परंतु अद्याप कारवाई झालेली नाही. आता पोलीस अधीक्षकांनी आवाहन करताच या पालकांनी समोर येत ही तक्रार केली. रात्री उशिरा पोलीस अधीक्षकांकडे तक्रारीचे पत्र देण्यात आले असून या तक्रारीवर पोलीस अधीक्षकांकडून तपास केला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

## धक्कादायक! वाल्मिक कराडचा तुरुंगातच 'गेम' करण्याचा कट?

### सुगावा लागताच खळबळ?; लवकरच नाशिकला हलविणार?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मुख्य आरोपी वाल्मिक कराड पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आता कराडच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची माहिती समोर येत असून, त्याला तुरुंगातच संपवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घडामोडींमुळे तुरुंग प्रशासनासह पोलिस यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

सध्या वाल्मिक कराड बीड जिल्हा कारागृहात असून, तिथे काही संशयास्पद हालचाली निदर्शनास आल्यामुळे त्याला तत्काळ दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कराडला लवकरच नाशिक जिल्हा कारागृहात हलवण्यात येणार आहे.

**कराड गँग विरुद्ध गिते गँग वाद; वाढतोय संघर्ष**

सामाजिक कार्यकर्त्यांसह मृत संतोष देशमुख

पान २ वर



### सुरक्षा कारणास्तव हलवण्याचा निर्णय

वाल्मिक कराडचा बीड तुरुंगातील मुक्काम अधिक काळ चालू राहणं धोका वाढवू शकतो, याची जाणीव तुरुंग प्रशासन आणि पोलिस दलाला झाली आहे. त्यामुळेच खबरदारी म्हणून त्याला नाशिकच्या कारागृहात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय वेळीच घेण्यात आल्यामुळे संभाव्य अनर्थ टळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### व्हायरल ऑडिओ क्लिपनं वाढवली खळबळ

दरम्यान, वाल्मिक कराडचीएक कथित ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या क्लिपमध्ये कराड कुणालातरी धमकावत असल्याचे ऐकायला मिळत असल्याचा दावा केला जात आहे. ही क्लिप खरंच कराडचीच आहे का, याची खातरजमा सुरू असून तपास यंत्रणा याकडे गांभीर्याने पाहत आहेत. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या केल्यानंतर जे फोटो व व्हिडीओ समोर आले होते, त्यातून आरोपींचा थेट संबंध वाल्मिक कराडशी असल्याचे उघड झाले होते. त्यामुळे त्याला मुख्य सूत्रधार ठरवून अटक करण्यात आली होती. पण तुरुंगातही त्याच्याविरोधात सुरू असलेल्या हालचालींमुळे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं बनलं आहे.

## खुनाच्या प्रकरणातील दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

### चऱ्हाटा रोड जवळ झाला होता खून, ॲड.अविनाश गंडले यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे दिड वर्षानंतर आरोपी निर्दोष

बीड । प्रतिनिधी

दि.०१/०८/२०२५ रोजी फिर्यादी नितीन नारायण माने याने पोलिसांनी दिलेल्या माहिती आधारे ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार दिली की, चऱ्हाटा रोडवरील रेल्वे ब्रिजच्या खाली मृत अवस्थेत एक प्रेत पडलेला आहे. सदरील माहिती फिर्यादीस मिळाल्यानंतर तो महाबळेश्वर येथे असल्याने त्यांनी त्याच्या घरच्या नातेवाईकांना घटनास्थळी पाठवून शहानिशा केली असता सदरील मृतप्रेत हे फिर्यादीचा भाऊ नामे पांडुरंग उर्फ पप्प्या नारायण माने यांच्या आहे हे निष्पन्न झाले. घटनेच्या दिवशी फिर्यादी सोबत विकास वायकुळे व ओंकार लकडे हे दोघे असल्याने केवळ संशयावरून त्यांच्याविरोधात तक्रार दिली.

पोलिसांनी प्रकरणाचा तपास करून सदरील प्रकरणांमध्ये मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर मा. न्यायालयात सेशन केस क्रमांक २१९/२०२३ हे प्रकरण करण्यात आले आरोपींच्या वतीने ॲड. अविनाश पं. गंडले यांनी तपासी अधिकाऱ्यासह एकूण १२ साक्षीदार तपासले. आरोपी पक्षाचा बचाव करतांना सातत्यपूर्ण पाठपुरावा, अभ्यासू युक्तिवाद तसेच आरोपींचा प्रस्तुत प्रकरणांमध्ये कसल्याही प्रकारचा सहभाग नसल्याचे ॲड. अविनाश

पान २ वर



# अखेर बीडच्या शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसाठी आता एसआयटी शिक्षणमंत्री दादा भुसेंची अधिवेशनात घोषणा

## सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभने उठवला होता आवाज!

बीड । प्रतिनिधी

बीडच्या शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटी नेमणार असल्याची घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी अधिवेशनात केली आहे. एसआयटी नेमून तीन महिण्यात चौकशी पुर्ण करू, घोटाळे करणारे कितीही मोठे असू द्या, त्यांच्यावर कठोर कारवाई करणार, फरकाची रक्कम वसूल करणार असे सभागृहात बोलताना मंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच आता जिल्ह्यातील घोटाळेबाजांचे धाबे दणाणले आहेत.



अगदी नागपूरप्रमाणेच बीड जिल्ह्यातही बोगसपणे शिक्षक भरण्यात आलेले आहेत. एका एका शिक्षकांकडून २० ते ५० लाख रूपये घेवून त्यांना संस्थाचालक आणि अधिकार्यांनी मिळून नियुक्त्या दिलेल्या आहेत. यातून कोट्यवधींचा फरकही काढण्यात आलेला आहे. जिल्ह्यात घडलेल्या या सगळ्या घोटाळ्यावर भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि सादेक इनामदार यांनी आवाज उठविलेला आहे. त्याअनुषंगानेच त्यांनी शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांना लेखी तक्रारीही केलेल्या आहेत. त्यानुसार सध्या चौकशीही सुरू आहे. मात्र मागच्या चार दिवसांपुर्वीच इंजि सादेक इनामदार यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची छ. संभाजीनगर येथे भेट घेवून त्यांना सदर प्रश्न किती गंभीर आहे याची माहिती दिली होती. त्यामुळे हा प्रश्न सध्या चालू असलेल्या अधिवेशनाच्या पटलावर आलेला आहे. याच प्रश्नावर काल सभागृहात प्रश्न उपस्थित झाला त्यावर मंत्री दादा भुसेंनी आपले स्पष्टीकरण दिले आहे. बोगसपणे शिक्षकांची भरती केल्याप्रकरणी आम्ही नागपूरला अधिकार्यांबरोबर संस्थाचालकांवर कारवाई केलेली आहे. त्यामुळे आम्ही घोटाळेबाजांना सोडणार नाही, कुणी कितीही मोठा असू द्या, त्यांच्यावर कारवाई करणारच, तसेच बोगसपणे काढलेल्या फरकाची रक्कमही संबंधितांकडून वसूल करणार, यासाठीच एसआयटी नेमणार आहे, ही एसआयटी येत्या तीन ते चार महिण्यात चौकशी पुर्ण करून अहवाल सादर करेल, त्यानंतर घोटाळेबाजांवर सरकारकडून नक्कीच कठोर कारवाई केली जाईल, असेही यावेळी मंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे. दरम्यान मंत्री दादा भुसें आता एसआयटी नेमणार असल्यामुळे शिक्षक भरतीमधील घोटाळेबाजांचे धाबे दणाणून गेले आहेत.



आरंभ
बीड जिल्ह्यातील शिक्षक भरतीचा कोट्यावधी रुपयांचा घोटाळा राज्यात गाजला? बीडच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केला नंगानाच ?
बोगस सह्या वापरून गैरव्यवस्था करण्याचा अनोखा प्रकार!
अबब.. बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठा भ्रष्टाचार अनेक शिक्षकांना नोकरी गमवावी लागणार, अनेक शिक्षकांच्या पायावर कुऱ्हाड?
शिक्षण संस्था चालकांकडून नोकरीचे आमिष दाखवून कोट्यावधी रुपयांचा केला घोटाळा?



आरंभ
राज्यात सध्या शिक्षक भरतीचा भ्रष्टाचाराचा विषय चर्चेत असतानाच, बीडच्या शिक्षण विभागात ५०० कोटींचा घोटाळा उघडकीस!
बीड जिल्ह्यात शिक्षक भरतीमध्ये खासगी संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा?
प्राथमिकचे शिक्षणाधिकारी फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागाने दिले?



मा.ना. रविंद्रजी चव्हाण साहेब यांची भारतीय जनता पार्टी पक्षाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्यामुळे मनस्वी हार्दिक हार्दिक अभिनंदन शुभेच्छा द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड.

## वहिती असलेल्या गायरान जमिनीवर उभे होत असलेले प्रकल्प रोखावे : मानवी हक्क अभियान

माजलगाव । प्रतिनिधी

दलित, आदिवासी, भुमिहीन हे गायरान जमीनीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवत असल्याने या जमिनीवर शासनाने प्रकल्प उभारु नये, अशी मागणी जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्या कडे दि. ३० जुन २०२५ रोजी मानवी हक्क अभियान च्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातील गायरान जमिनीवर दलीत, आदिवासी, भुमिहीन कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असल्याने व त्यांनी या जमिनी नावे होण्यासाठी अनेकदा शासनाने काढलेल्या शासकिय जी.आर नुसार असलेले नियम, अटीची पुर्तता केलेली प्रस्ताव शासनाकडे दाखल केलेले आहेत. परंतु शासनाकडून या जमिनीवर विविध प्रकल्प उभे करून या कुटुंबावर अन्याय केला जात आहे. सदरील गायरान जमिनीवर असे कोणतेही प्रकल्प उभे करु नयेत अशी मागणी केली आहे.

यावेळी सांळीबा ता. वडवणी येथील गायरानधारकांनी सुद्धा अशी मागणी चे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. यावेळी मानवी हक्क अभियान चे तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब थोरात, रमेश गवळी, संदीप वाघमारे, महादेव उमाप, बंडू लोखंडे, विष्णू मुजमुले, कपील आडागळे, राजेश थोरात आदी मान्यवर सहभागी झाले होते.

## चिंचोली माळी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना भागवतेय पंधरा गावची तहान

### ना. पंकजाताई व मा. खासदार प्रीतमताई, आ. नमिता मुंडदा यांनी दिली योजना; पंचायत समिती सभापती पती विष्णू घुले यांच्या पाठपुराव्याला आले यश

केज । प्रतिनिधी





तालुक्यातील चिंचोली माळी येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना भागवत आहे १५ गावची तहान ही योजना २०१९ मंजूर करून घेण्यासाठी सभापती पती विष्णू घुले यांनी मंत्री पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे व आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या सहकार्याने ही योजना मंजूर करून घेतली होती व त्याचे काम २०२३ पर्यंत पूर्ण केले आहे. या योजनेमुळे १५ गावातील जवळपास २६००० च्या वर लोकांची तहान भागवली जात आहे यामुळे पंधरा गावातील लोकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्नन मिटला आहे. त्यामुळे विष्णू घुले यांचे परिसरातून कौतुक केले जात आहे.

चिंचोली माळी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ही धनेगाव धरणातून १५ गावांना पाणी पिण्यासाठी आणलेली आहे. या योजनेतून चिंचोली माळी या ठिकाणी एक पाणी फिल्टर व इतर गावांमध्ये पाच पाण्याची टाकी असून याद्वारे सर्व गावांना पाणी मिळत आहे. या योजनेची सीईओ आदित्य जीवने यांनी पाहणी करून योजना चांगल्या प्रकारे पूर्ण केल्यामुळे त्यांचे कौतुकही केले आहे. या योजनेतून पंधरा गावच्या लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळत आहे.

त्यामुळे गावातील लोकांमध्ये पिण्याचे पाणी मिळत असल्यामुळे योजनेचे कौतुक केले आहे. काही दिवसापूर्वी बीड जिल्हा परिषद पाणीपुरवठा अभियंता व त्यांची सर्व टीम येऊन सर्व योजनेची पाहणी केली आहे व सर्वत्र पाणी सुरळीत चालू असल्याचे पाहून त्यांनी देखील कौतुक केले आहे ही योजना पंचायत समिती सभापतीपती विष्णू घुले यांच्या पाठपुराव्यामुळे झाली असून त्यामुळे आता परिसरातील १५ गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नन कायमचा मार्गी लागला आहे.

पान १ वरून...

### एसपी साहेब आपण...

अधीक्षक नवनीत कॉवत यांनी सांगितले होते की, वादग्रस्त व्हिडिओ, कॉल रेकॉर्डिंग व्हायरल करणाऱ्यांवर कारवाई करणार मग आता विजयसिंह बाळा बांगर यांनी वादग्रस्त कॉल रेकॉर्डिंग व्हायरल केली आहे. त्यांच्यावर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत कारवाई करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी वेगवेगळे उपाय करत गुन्हेगारीत गढूळ झालेले वातावरण स्वच्छ करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे सातत्याने प्रयत्नशील आहेत पण् गुन्हेगारी बरोबर राजकीय कुरघोड्या व एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. सरपंच देशमुख हत्या प्रकरणाने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती त्यानंतर किट्टी आडगाव येथे भर दिवसा भाजपाच्या एका नेत्यांची हत्या करण्यात आली गल्ली ते दिल्ली असलेल्या भाजपाच्या बूथप्रमुखावर हल्ला होतो तर सर्वसामान्याचे काय असा सवाल उपस्थित होत असताना बीड जिल्ह्याची गुन्हेगारी काही थांबण्याचे नाव घेत नाही त्यातच राजकीय नेत्यांनी केलेल्या कहार नाम्याची मालिकाच लावलीय आरोपी असलेले वाल्मीक कराड यांचे जुने सहकारी विजयसिंह बाळा बांगर यांनी आज कराड यांच्या विरोधात भूमिका घेत वेगवेगळे आरोप केले आहेत ९ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील केज तालुक्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली होती गेल्या सहा महिन्यापासून विजयसिंह बाळा बांगर यांनी वाल्मीक कराड यांच्यावर आरोप का नाही केले? यामागचे कारण काय असू शकते. विजयसिंह बाळा बांगर यांचा बोलवता धनी कोण? महाराष्ट्रभर ढवळून निघालेल्या देशमुख प्रकरणावर विजयसिंह बाळा बांगर सहा महिने गप्प का होते? अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचारा प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आवाज उठवल्यानंतरच बांगर झोपेतून जागे झाले का? का विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर व आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी बोलका पोपट केला की काय? असे अनेक संशय बांगर यांच्या आरोपावरून पाहायला मिळत आहे म्हणून दलित व वंजारी समाजात भयंकर ते निर्माण करण्याचे मोठे षडयंत्र रचले जात आहे याचे परिणाम म्हणून समाजा समाजात वाद निर्माण होत एकमेकांची डोके फोडून गुन्हेगारीत वाढ होईल म्हणून याकडे बीड जिल्हा प्रशासनाने तात्काळ लक्ष्य घालावे अशी मागणी होत आहे.

### धक्कादायक! वाल्मिक...

यांच्या कुटुंबीयांनी यापूर्वीच कराडला बीडच्या तुरुंगातून हलवण्याची मागणी केली होती. यामागे एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कराड गँग आणि गिते गँगमधील वाढता संघर्ष. काही दिवसांपूर्वी दोन्ही गँगमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कराडच्या जीवाला अधिक धोका निर्माण झाला होता.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अन्य आरोपी सुदर्शन घुले, प्रतीक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे आणि महेश केदार हेही बीडच्या कारागृहात आहेत. परंतु यातील फोकस आता मुख्य आरोपी कराडवर आहे, कारण त्याला लक्ष्य केलं जाऊ शकतं, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

### खुनाच्या प्रकरणातील ...

पं. गंडले न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही आरोपींची कोणताही सबळ पुरावा नसल्याने तसेच आरोपींवर आरोप सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष लागले होते.

केवळ एक वर्ष सहा महिने अठ्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने ॲड. अविनाश पं. गंडले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आरोपींच्या वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले तर त्यांना या कमी ॲड. इम्रान पटेल, ॲड. गोवर्धन पायाळ, ॲड. तेजस नेहरकर, ॲड. नामदेव माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. शुभम सरवदे, ॲड. सचिन गिरी, ॲड.राजेश शिंदे, ॲड. अनिकेत गंडले, आशुतोष गंडले, आदींनी सहकार्य केले.

### हातभट्टीची दारु तयार...

तिची चोरटी निर्मीती व विक्री करण्याबाबतचे गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्यामुळे पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत व अंबाजोगाई शहरात व परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ३०.०६.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारील करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसामान्य जनतेचे आरोग्य चांगले रहावे हा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ०१.०७.२०२५ रोजी ताब्यात घेऊन पो. स्टे. अंबाजोगाई ग्रामीण येथे हजर केले. पो.नि. अंबाजोगाई ग्रामीण यांनी सदर इसमास दिनांक ०१.०७.२०२५ रोजी १५.२६ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करणे करीता रवाना केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्रीमती. चेतना तिडके, उविपोअ अंबाजोगाई श्री. चोरमले यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड, पो.नि. मुरलीधर खोकले, पोउपनि रहीम चौधरी, पोह/कल्याण देशमाने, महेश भागवत, बापु राउत, जयदीप कसबे सर्व पो.स्टे. अंबाजोगाई ग्रा. यांचेसह, पोउपनि सुशांत सुतळे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, विष्णु सानप, मारुती कांबळे, भागवत शेलार, आनंद मस्के, अतुल हराळे, बिभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ-कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

### अल्पवयीन विद्यार्थिनीच्या...

आत्महत्यासारख्या धक्कादायक घटना घडल्या आहेत. त्यातच, आता बीडमध्ये अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अशातच बीड शहरातील खासगी क्लासमध्ये झालेल्या अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी शिक्षक विजय पवार विरोधात आणखी एका पालकाने तक्रार दाखल केली आहे.

विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणात पोलीस कोठडीत असलेल्या विजय पवार विरोधात आणखी एका पालकाने तक्रार केलीय. विजय पवार संचालक असलेल्या एका शाळेत दोन वर्षांपूर्वी अशाच पद्धतीने एका विद्यार्थिनीला शाळेमध्ये झालेल्या वादाच्या कारणातून त्रास दिला गेल्याची तक्रार संबंधित मुलीच्या पालकांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

## मी आरोग्य सेवक बोलतोय हे आत्मकथन : नितीन महुवाले

मी आरोग्यसेवक बोलतोय
नमस्कार मित्रांनो,

मी जिल्हा परिषद बीड महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागात कार्यरत असणारा एक आरोग्यसेवक बोलतोय. अनेक दिवसापासुन ठरविले होते तुमच्याशी हितगुज करावे, मी आरोग्यसेवक म्हणुन काय कार्य करातो, मला येणाऱ्या अडचणी, माझ्या कामातुन मला मिळणारा आनंद हे सारे आज मी तुमच्यासमोर आत्मकथन रुपात मांडणार आहे. मी एक आरोग्यसेवक आहे मी नौकरी ला लागण्या अगोदर मी ऑटोरिक्षा चालवत होतो व होमगार्ड मध्ये पण होतो हे सर्व करत असताना मी आरोग्य सेवक पदाची परिक्षा दिली व नौकरी ला लागलो वर्ष २०१५ मध्ये तत्कालीन जिल्हा अधिकारी मा श्री सुनिलजी केंद्रे साहेबांच्या पर्यत्नाने व त्यांच्या आर्शिवादाने मला कायमची भाकर भेटली. वर्ष २०१९ ते वर्ष २०२० मध्ये जगावर कोरोना महामारी आली होती त्या वेळेस मी रात्र दिवस एक करून जन सेवा केली त्या दरम्यान मला माझ्या कार्य क्षेत्रांतील ग्रामपचायत च्या वतीने माझा कोरोना योद्धा प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले होते प्रत्येक ग्रामसेवक व सरपंच यांनी माझा हृदय सत्कार केले आहेत.

तसे पाहता डॉक्टर ही पदवी मिळविण्यासाठी खुप शिकावे लागते, खुप अभ्यास करावा लागतो आणि पैसाही भरपुर लागतो तेव्हा कुठे नावापुढे डॉक्टर ही पदवी लागते. पण ह्याबाबतीत मी स्वतःला खुप भाग्यवान समजतो. कारण मी दहावी उत्तीर्ण असुन तरीदेखील गावात लोक मला डॉक्टर म्हणुन हाक मारतात. हे मी माझे भाग्यच समजतो. लोक माझ्याशी त्यांच्या आजाराविषयी मनमोकळेपणाने सांगतात. मित्रांनो तसे पाहिले तर मी तपासणी करत नाही, इंजेक्शन देत नाही, सलाईन लावत नाही. तरी मी गावात डॉक्टर म्हणुन ओळखला जातो. अहो माझ्याकडे देण्यासारखे चार क्लोरोक्वीन व चार फ्युराझोलाडीन हेच असते. मी आरोग्यशिक्षण देतो. माझे मुख्य कार्य समुपदेशनाचे असुन मी जनतेस आरोग्यविषयक सल्ला देण्याचे काम करतो.

चला मित्रांनो आता मी माझा दिनक्रम कसा असतो त्याबाबत तुम्हांला सांगणार आहे. माझ्या कामाची सुरुवात सकाळी साधारणपणे आठ ते साडेआठ वाजता फिल्डवर गेल्यावर होते.गृहभेटी देत असतांना मी आवाज देतो ताई कुणाला थंडीताप आहे का? माझा आवाज ऐकल्यावर ज्याला थंडीताप आहे तो मला सांगतो डॉक्टर मला थंडीताप आहे. मग मी त्याच्या कपाळावर व गळ्याला हात लावुन ताप आहे की नाही याची तपासणी करतो. जर ताप आहे असे वाटल्यास मी त्याला सांगतो भाऊ तुम्हांला ताप आहे तुमचे रक्त तपासणीसाठी घ्यावे लागेल. त्यावेळी तो मला विचारतो डॉक्टर रक्त कशासाठी घेणार. तेव्हा मी त्याला समजावुन सांगतो भाऊ कुठलाही ताप हिवताप असु शकतो. म्हणुन तुमचे रक्त तपासणे आवश्यक आहे. कारण हिवताप हा आजार संसर्गजन्य आजार आहे.तो जर तुम्हांला झाला तर तुमच्या घरातील व्यक्तिंना, गल्लीतील इतरांना होऊ शकतो.म्हणुन कुठलाही ताप अंगावर काढु नये. येता कणकण तापाची, करा तपासणी रक्ताची मग मी त्याचे रक्त तपासणीसाठी घेतो आणि त्याला चार क्लोरोक्वीन देतो. आणि त्याला सांगतो भाऊ ह्या गोळ्या जेवनानंतरच घ्या. हे ऐकुन तो मला म्हणतो डॉक्टर तुमच्याकडच्या ह्या गोळ्या पॉवरफुल असतात हे मला माहीत आहे. मी जेवणानंतरच घेईल. एक मात्र खरे आहे माझ्याकडील गोळ्यांची लोकांमध्ये दहशत आहे. अशा प्रकारे मी ताप असलेल्या लोकांचे रक्तनमुने घेतो. त्यानंतर माझा मोर्चा कंटेनर सर्व्हेक्षणाकडे वळतो. मी पाण्याच्या टाक्यांची तपासणी करतो. त्यास डासअळी आहेत का याची तपासणी करतो. हे करत असतांना लोक मला विचारतात, अहो डॉक्टर तुम्ही पाण्याच्या टाक्या का तपासता आहात? मग मी त्यांना सांगतो अहो भाऊ, ह्या पाण्याच्या टाक्यांमध्ये मलेरिया, डेंग्यु, चिकनगुनीया इत्यादी आजार पसरविणारे डास अंडी घालतात. हे डास स्वच्छ पाण्यात अंडी घालतात. कोषापासुन डास तयार होण्यास सात दिवस लागतात. म्हणुन आठवड्यातुन एक दिवस कोरडा पाळावा त्यामुळे डास उत्पत्ती थांबते. तसेच पाण्याच्या टाक्यांवर झाकण ठेवावे. परिसरातील पाण्याचे डबके बुजवावे किंवा त्यामध्ये खराब ऑईल किंवा रॉकेल टाकावे. घरातील खिडक्यांना जाळ्या बसवाव्या. घरातील फ्रीज, कुलर स्वच्छ ठेवावे. टायर, नारळाच्या करवंट्या, घरातील झाडाच्या कुंड्या यामध्येही डास अंडी घालतात. तसेच डासांना पळवुन लावणारी अगरबत्तीचा वापर करावा. तसेच झोपतांना अंगभर कपडे घालुन झोपावे. असा सल्ला देऊन ज्या पाण्याच्या टाक्यांमध्ये डास अळी आढळतात त्यात ॲबेट टाकतो व ॲबेट टाकलेल्या टाक्या दोन तासानंतर उपसुन टाका असा सल्ला देतो.

नंतर मी गावातील पाणीपुरवठा संबधी सर्व्हेक्षण करतो. पाईपलाईन लिकेज, व्हॉल लिकेज आहे का त्याची पाहणी करुन पाईपलाईन लिक असेल तर ग्रामपंचायतीस पत्रक देऊन त्याची दुरुस्ती करुन घ्यावी. कारण पाईपलाईन किंवा व्हॉल लिकेज असले तर दुषीत पाणीपुरवठा होऊन गावात गॅस्ट्रोची साथ लागु शकते. पावसाळ्यात ह्याबाबत खुप दक्षता घ्यावी लागते. नंतर मी गावातील पाण्याच्या डबक्यांमध्ये गप्पी मासे सोडतो. गप्पी मासे सोडत असतांना लोक मला विचारतात अहो डॉक्टर डबक्यांमध्ये मासे का टाकता आहात? मग मी त्याआना सांगतो भाऊ हे गप्पी मासे असुन डबक्यांमध्ये सोडल्यामुळे सोडल्यामुळे गप्पी मासे डबक्यांमध्ये असणारे डास अळी खाऊन टाकतात आणि डास उत्पत्ती थांबते. अशा प्रकारे माझा दिनक्रम पार पडतो. मित्रांनो तुमच्या मनात विचार येत असेल अरे वा डॉक्टरांना खुप कमी काम आहे. पण तसे काही नाही. मी आरोग्यसेवक म्हणुन किती कामे करतो ते तुम्हांला पुढे कळेलच.



आता मला दरमहा कोणकोणती कामे करावी लागतात त्याबाबत थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो. दरमहा लसीकरण सत्र असतात. लसीकरणात लहान बालके व गरोदर माता यांना लस दिली जाते. वास्तविक हे अतिशय महत्वपुर्ण काम माझी आरोग्यसेविका भगिनी करीत असते. मी मदतीला असतो. लसीकरणामुळे लहान बालकांना विविध आजारांपासुन संरक्षण मिळते. तसेच गरोदर मातांनाही संरक्षण मिळते. त्यानंतर मी कुष्ठरोग, क्षयरोग इत्यादी आजारांचे रुग्ण शोधतो. अंगावर पांढरे चट्टे असलेले रुग्ण संशयीत कुष्ठरुग्ण असतात, तर तीन आठवड्याहुन अधिक जर खोकला असेल तर संशयीत क्षयरुग्ण असतात. कुष्ठरोग बाधीत रुग्ण बघितल्यावर माझ्या मनास खुप वेदना होता. कुष्ठरोग व्यक्तिला सहा व एक वर्ष याप्रमाणे गोळ्या देतो. तर क्षयरोग असलेल्या व्यक्तिला सहा महिने गोळ्या देतो. मी तळागाळात जाऊन असे रुग्ण शोधण्याचे कार्य करतो. अंधत्व निवारणाचे कामही करतो. दरमहा मी पिण्याचे पाणी तपासणीसाठी घेतो. पिण्याचे पाणी योग्य की अयोग्य ह्यासाठी तपासणीसाठी घेतो. तसेच वर्षातुन दोन वेळा पिण्याचे पाणी रासायनिक तपासणीसाठी घेतो. ढउङ नमुनेही तपासणीसाठी पाठवितो. ग्रामपंचायतीस भेट देऊन ढउङ साठा तपासणी करतो. ग्रामपंचायत मध्ये असलेल्या जढ ढर्शीं रजिस्टर व ढउङ साठा रजिस्टर याची पाहणी करुन पाणीपुरवठा संबधी काही सुचना असल्यास त्या रजिस्टरवर नोंद करुन ग्रामसेवकास सुचना देतो. वर्षातुन दोन वेळा पाणीपुरवठा सर्व्हेक्षण करुन ग्रामपंचायतीस हिरवे, पिवळे व लाल कार्ड देतो. तुम्ही म्हणाल आता ही काय भानगड आहे. हिरवे कार्ड ग्रामपंचायतीस दिल्यास त्या ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठा सुरक्षित व चांगला आहे. पिवळे कार्ड दिल्या मध्यम जोखीम व लाल कार्ड दिल्या त्या ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठा तीव्र जोखमीचा असुन अशा गावांना जलजन्य आजारांची साथ लागु शकते

मित्रांनो, आता मला न आवडणारे व खुप अवघड वाटणारे कार्य म्हणजे कुटुंब कल्याण कार्यक्रम हे होय. मी मला दिलेले सर्व कामे उत्साहाने करतो पण कुटुंब कल्याण कार्यक्रम म्हटला की अंगावर काटे येतात कारण एक कुटुंब कल्याणची केस प्रवृत्त करण्यास किती अडचणी येतात ते मलाच माहित आहे. कारण केस शस्त्रक्रियेसाठी टेबलापर्यत आणण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते. मला वार्षिक २४ कुटुंबकल्याण शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट असते. हे काम करतांना अनंत अडीअडचणी येतात आणि त्या अडीअडचींचा सामना करुन मी हे काम पुर्ण करण्याचा माझ्यापरीने प्रयत्न करीत असतो. इथे मला अजुन एक गोष्ट आवर्जुन सांगावीशी वाटते वर्षभर मी इतर कितीही कामे केली आणि कुटुंबकल्याण केसेस केल्या नाही तर मला माझ्या वरिष्ठांचे खुप बोलणे ऐकावे लागतात. थोडक्यात माझ्या कामाचे मुल्यमापन कुटुंब कल्याण केसेस वरच अवलंबुन असते ह्या ठिकाणी मी शासनास नम्रविनंती करतो की माझ्या कामाचे मुल्यमापन फक्त कुटुंब कल्याण कार्यक्रमातुन न करता इतर जे मी कामे करतो त्याचाही विचार केला जावा. वर्षभरातुन एकवेळा कुष्ठरोग सर्व्हेक्षण करावे लागते. आता मदतीला आशा स्वयंसेविका आल्यामुळे हे काम आशास्वयंसेविका करतात. त्यामुळे माझा भार काहीसा कमी झालेला आहे. मिशन इंद्रधनुष्य ह्या मोहिमेत काम करावे लागते. खरोखरच ही योजना खुप चांगली आहे. लसीकरणापासुन एकही बालक व एकही गरोदर माता वंचित न राहता सर्वांना लसीकरणाचा लाभ दिलाच गेला पाहिजे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे मित्रांनो मागच्या वर्षी मी मिशन इंद्रधनुष्य या योजनेची अतिशय प्रभावीपणे माहिती तळागाळापर्यत देऊन मी उत्तम प्रकारे जनजागरण केले. वृत्तपत्रांनी देखील माझ्या कार्याची दखल घेतली. मी ह्या मोहिमेत चांगल्या प्रकारे कार्य केल्यामुळे मला आत्मिक समाधान लाभले या मोहिमेत साधारणपणे मेंढपाळ, ऊसतोड कामगार, विटभट्टी कामगार, शेतात राहणारे शेतमजुर यांचे विशेष सर्व्हेक्षण करुन त्यांना लाभ दिला जातो. एप्रिल महिन्यात मला कुटुंब पाहणी सर्व्हेक्षण करावे लागते. प्रत्येक कुटुंबाची माहिती गोळा करुन गोषवारा काढावा लागतो. गोषवारा काढण्याचे काम अतिशय किचकट असते. जुन महिन्यात हिवताप प्रतिरोध महिना साजरा केला जातो गावात प्रभातफेरी काढुन, दवंडी देऊन जनजागरण केले जाते. जुन महिना संपल्यावर जुलै महिन्यात डेंग्यु प्रतिरोध महिना साजरा करावा लागतो. डेंग्युजागरण करतांना मी शाळेत व्याख्यान घेऊन, गावात प्रभातफेरी, दवंडी हे कामे करुन डेंग्युजागरण करतो. ह्यावर्षी माझ्या कार्यशाळेत मी डेंग्युजागरण खुप मोठ्या प्रमाणात केले. इथे एक गोष्ट मला आवर्जुन सांगावीशी वाटते मी ह्यावर्षी डेंग्युजागरण करतांना प्रा.आ.केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमधील शाळेंमध्ये डेंग्युजागरण संदर्भात व्याख्यान दिल्यामुळे अनेक गावातील शाळेतील मुले मला बघितल्यावर डेंग्यु डॉक्टर ह्या नावाने हाक मारतात ही हाक म्हणजे मी केलेल्या कार्याची पावती समजतो. वर्षातुन दोन वेळा जंतनाशक मोहीम राबवावी लागते. लहान बालकांना जंतांपासुन संरक्षण मिळावे म्हणुन ही मोहीम राबविली जाते. अतिसार सप्ताह राबवितो. वर्षभरातील अनेक महत्वपुर्ण कामे करावी लागतात. अशा महत्वपुर्ण कामांमध्ये च् नंबर व स्टेन्सीलींग हे एक अतिशय अवघड काम मला करावे लागते. हे काम मी माझ्या परिने पुर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

ह्या वर्षी पंतप्रधान मातृवंदन ही नवीन योजना आली. ह्या योजनेतही मी चांगल्या प्रकारे कार्य केले. ह्या योजनेअंतर्गत प्रथम प्रसुती होणाऱ्या मातेस पाच हजार रुपये दिले जातात. मित्रांनो अशाप्रकारे मी वर्षभर राबविल्या जाणाऱ्या विविध मोहिमांमध्ये कार्य करुन जनतेस चांगल्या प्रकारची आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्या व्यतिरिक्त शासनाच्या ऐनवेळी येणाऱ्या योजनांमध्येही काम करावे लागते. त्यामध्ये स्वच्छ भारत,हगणदारी मुक्त भारत अशा विविध योजनेअंतर्गत मी कार्य करीत असतो. आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर ह्यामध्ये सुध्दा कार्य करतो.

मित्रांनो मी हे सर्व कामे आर्वजुन करतो आत्मकथनाकडे वळतो. कधी कधी मला काम करतांना अनेक अडचणी येतात. पण त्या अडचणींवर मात करुन मी जनतेस आरोग्यसेवा देण्याचे काम प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करतो. मित्रांनो मी माझे आत्मकथन आपल्यासमोर मांडल्यामुळे मला खुप आनंद झाला.मी आरोग्यसेवेत कार्य करतांना विविध आजारांनी त्रस्त लोक मला भेटतात. मी माझ्या परीने त्यांना आरोग्यसेवा देऊन व समुपदेशन करुन त्यांचा त्रास कमी होऊन त्यांची प्रकृती चांगली होईल यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो. मला माझ्या कामातुन समाधान मिळते व गोरगरीबांची सेवा करण्याची संधी मिळते.

जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा
चला मित्रांनो, माझे आत्मकथन कसे वाटले

**आपलाच एक आरोग्य सेवक**
**नितीन महुवाले**
**प्रा.आ.केंद्र राजुरी नवगण**
**उपकेंद्र - तळेगांव ता.जि. बीड**

# सिरसाळ्यात जिओ नेटवर्क रेंजमध्ये गती!

## जिओ सिम कार्ड वापरणाऱ्यांना नाहक त्रास

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा परिसरात जिओ नेटवर्कची सेवा अत्यंत खराब झाली असून, इंटरनेट स्पीड बुलडोझरच्या गतीने सुरू असल्याचा अनुभव ग्राहक घेत आहेत. यामुळे जिओ सिमकार्ड वापरणाऱ्या ग्राहकांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गेल्या काही दिवसांपासून सिरसाळ्यामध्ये जिओ नेटवर्कच्या इंटरनेट सेवेचा दर्जा प्रचंड खालावला आहे. सोशल मीडिया वापरणे, ऑनलाइन व्यवहार करणे किंवा अगदी साधे मेसेज पाठवणे हे देखील एक मोठे आव्हान बनले आहे. ग्राहकांच्या मते, नेटवर्क कधी येईल आणि कधी जाईल याचा काही नेम नाही. अनेकदा नेटवर्क असूनही इंटरनेट अजिबात चालत नाही किंवा त्याची गती




इतकी कमी असते की एखादे पान उघडायलाही खूप वेळ लागतो. स्थानिक जिओ वापरकर्त्यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आम्ही चांगल्या सेवेसाठी पैसे मोजतो, पण त्या बदल्यात आम्हाला फक्त निराशा मिळतेय, असे एका संतप्त ग्राहकाने सांगितले.

विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग, व्यापाऱ्यांचे डिजिटल व्यवहार आणि सामान्य नागरिकांचे दैनंदिन कामकाज यामुळे ठप्प झाले आहे. या समस्येबाबत जिओ कंपनीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. सिरसाळ्यातील जिओ ग्राहकांनी त्वरित या समस्येचे निराकरण करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून त्यांना अखंडित आणि वेगवान इंटरनेट सेवा मिळू शकेल. अन्यथा, ग्राहक इतर नेटवर्क कंपन्यांकडे वळण्यास मागेपुढे पाहणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# श्री क्षेत्र दत्त संस्थान येथे गुरुपौर्णिमा उत्सव व श्रीमद गुरूचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन

### श्रींच्या नुतून रजत मुर्ती चलप्राणप्रतिष्ठा निमित्ताने २ दिवसीय दत्तयागाचे आयोजन; दत्तउपासक गुरूवर्य धर्माचार्य श्रीहरी महाराज पवार यांच्या अधिपत्याखाली भव्यदिव्य सोहळा



बीड । प्रतिनिधी

प्रति गाणगापूर अशी ओळख असलेले श्री क्षेत्र दत्त संस्थान, कोल्हारवाडी फाटा, बीड येथे गुरुपौर्णिमा उत्सवा निमित्ताने श्रीमद् गुरुचरित्र पारायण व गुरुपौर्णिमा उत्सव सोहळा आयोजित केला आहे. तब्बल १५ वर्षांची परंपरा जपत श्री अवधुत दत्त देवस्थान च्या वतिने दि.०३ जुलै गुरुवार ते १० जुलै गुरुवार या कालावधीत सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये श्रीमद् गुरुचरित्र पारायण, श्रींची पुजा व आरती, हरिपाठ, श्री दत्त महामाला मंत्र जप अनुष्ठान, दत्तयाग हवन व अन्नदान असे दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन आहे.

महाराष्ट्रात नामांकित असलेल्या या सोहळ्यात सकाळी ९ ते १२ श्रीमद् गुरुचरित्र पारायण, दुपारी १२:३० श्रींची पुजा व आरती, संध्या ५ वा. हरिपाठ व श्री दत्त महामाला मंत्र अनुष्ठान व संध्या ७:३० वा श्रींची सांज आरती होईल. दि.९ जुलै व १० जुलै रोजी श्रींच्या नुतून रजत मुर्ती चलप्राणप्रतिष्ठा निमित्ताने २ दिवसीय दत्तयाग होईल. दि.१० जुलै गुरुवार गुरूपौर्णिमा या दिवशी दुपारी १२ वा. श्रींची महाआरती होईल व तदनंतर संस्थान तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सामुहिक गुरुमंत्र सोहळा दुपारी २ वाजता होऊन सायंकाळी ७ ते १० यावेळेत श्रींचा पालखी सोहळा होईल. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र दत्त संस्थानचे दत्तउपासक गुरूवर्य धर्माचार्य श्रीहरी महाराज पवार यांनी केले आहे.




## आईच्या वाढदिवसा निमित्त मुलाचा माणुसकीचा झरा अनाथ मुलांना अन्नधान्य व कपडे वाटप करून केला वाढदिवस साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

सौ.मंगल रामराव जवळकर यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांच्या पुत्र प्रकाश जवळकर यांच्या वतीने पसायदान प्रकल्प, ढेकानमोह आणि जिव्हाळा प्रकल्प, बीड येथे अन्नधान्य व कपड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत गरजू कुटुंबांना धान्य, कपडे आणि जीवनावश्यक वस्तू वितरित करण्यात आल्या. सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबवण्यात आला असून, त्याला स्थानिक ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभले.

प्रकाश जवळकर यांनी यावेळी सांगितले की, आईच्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी काही सकारात्मक करावे या हेतूने हा उपक्रम राबवला. पुढील काळातही असे उपक्रम सुरू ठेवण्याचा मानस आहे. या उपक्रमामुळे अनेक गरजूंना थोडा दिलासा मिळाला असून, प्रकाश जवळकर यांच्या सामाजिक जाणिवेचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाढदिवस साजरा करण्याचा हा अनोखा आणि सेवाभावातून साकारलेला उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

शिरूर (का.) । प्रतिनिधी

दि.०१ जुलै २०२५ मंगळवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'हारित क्रांतीचे प्रणेते, पंचायतराज,श्वेतक्रांती,व रोजगार हमी योजनेचे जनक 'स्व.वसंतराव नाईक' यांची जयंती कृषीदिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या हस्ते,'माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून, वसंतराव नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी, राजनितीज्ञ आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते.




कृषी क्षेत्रात त्यांनी आपल्या महाराष्ट्राचे नाव देशभरात लौकीक केले. तसेच आधुनिक भारतीय शेती आणि शेतकर्यांच्या त्यांनी मान उंचावल्या हे आपणास विसरता येणार नाही. असे मत आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.नारायण घोलप, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे, प्रा.संजय काकडे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.महादेव हांगे, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.नारायण तांबे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ.आत्माराम झिंजुर्डे, डॉ.सत्यनारायण ढवळे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.अशोक सवासे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, डॉ.अशोक घोडके, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अमर खोले, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, अर्जून नेटके, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे, बाळासाहेब येवले, वसंत आहेर, राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, दत्ता शिंदे इत्यादिंची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन जयेंद्र निकम यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,'वसंतराव नाईक' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

# कृषी मित्र कोकाटे यांनी केले शेतीशाळेचे आयोजन

जातेगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील कृषी मित्र तसेच संध्या मल्टी सर्विसेस चे संचालक बाबू कोकाट यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै हा कृषी दिन म्हणून साजरा करण्यात येतो त्यानिमित्त संध्या मल्टी सर्विसेस ठाकर आडगाव मध्ये कृषीदिन साजरा केला. कृषी दिनाच्या निमित्ताने शेतकरी बांधवांसाठी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रगतीशील शेतकरी यांचा सन्मान तसेच शेतकरी बांधवांना १ जुलै पासून सुरू होणाऱ्या प्रधानमंत्री पिक विमा तसेच फॉर्मर आयडी ॲग्रिस्टॅक नोंदणी आणि ई-पीक पाहणी, महाडीबीटी मधील योजनेची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.




विशेष करून सर्व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन कृषी मित्र बाबू कोकाट यांनी केले आहे. यापुढे फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी विषयक विविध योजनांचा लाभ मिळणे बंद होणार आहे. याबाबत कृषी विभागाने सांगितले आहे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या नावावर ७/१२ उतारा आहे अशा सर्व शेतकऱ्यांनी आपल्या गावातील किंवा जवळील सीएससी केंद्रांशी संपर्क साधून तात्काळ फार्मर आयडी तयार करून घ्यावा प्रत्येक नागरिकाची ओळख जशी आधारकार्ड द्वारे होते, त्याचप्रमाणे शेतकरी असल्याची अधिकृत ओळख फार्मर आयडीद्वारे होणार आहे. यामुळे शासनाच्या कृषी विषयक सर्व योजना, सवलती आणि लाभ मिळवण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक आहे. फार्मर आयडी नसल्यास पीएम किसान सन्मान निधी, नमो शेतकरी महासन्मान निधी, पिक विमा, अश्या अनेक शासनाच्या योजना शेतकऱ्यांना फार्मर आयडी शिवाय मिळताना अडचण येऊ शकते अशी माहिती कृषी मित्र तसेच संध्या मल्टी सर्विसेस चे संचालक बाबू कोकाट यांनी दिली. यावेळी गावातील शेतकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त माजलगावात कृषी दिन साजरा




माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव पंचायत समिती सभागृहात कृषी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्सना मुळीक यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक करताना कृषी अधिकारी एस.एस. भोकरे यांनी नाईक साहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकला. मंडळ कृषी अधिकारी अतिश चाटे यांनी पिक संरक्षण व सध्याच्या हवामानातील उपाययोजना यावर मार्गदर्शन केले.

तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे यांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाबरोबरच सध्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. कार्यक्रमात २०२४-२५ मधील पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सहाय्यक गटविकास अधिकारी डोंगरे, कृषी अधिकारी डी.एल. गडपाळे, उद्यान पंडित शिवाजी शिंदे, अण्णासाहेब जगताप यांची उपस्थिती होती. कृषी सखी, अधिकारी, कर्मचारी, व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन डी. एल. गडपाळे यांनी मानले.

# वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा; व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

केज । प्रतिनिधी

पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया. ही संकल्पना घेऊन व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप, धनेगावच्या वतीने व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त धनेगाव कॅम्प येथील व्हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

सद्य परिस्थितीत मोबाईल मध्ये गुंतलेली तरुण पिढी आणि त्यामुळे मैदानी खेळ मोबाईलच्या युगात लोप पावत असताना मात्र धनेगाव कॅम्प व परिसरातील तरुणांनी एकत्र येत व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपची स्थापना केली आहे. दैनंदिन हे तरुण मैदानावर एकत्र येत व्हॉलीबॉल खेळाचा आनंद घेत असतात. त्यातील व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण करून आगळा वेगळा वाढदिवस साजरा केला आहे. यावेळी रवींद्र नवले, धनंजय गुजर, सिद्धार्थ पोटभरे, सत्तार शेख, सुनील गुजर, अमोल गोरे, सुजय पकवे, सुहास गुजर, गणेश शिंपले, नबी सय्यद, अजय वाघमारे, बालाजी सिरसाट, कैलास गुजर, सिद्धेश्वर गुजर, ओम आंबुरे यांच्यासह व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.



# बीड शहर बचाव मंचाच्या वतीने कृषी क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

हरितक्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची आज बीड शहर येथे संत भगवान बाबा चौक या ठिकाणी अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच श्रद्धा भावाने अभिवादन करून बीड शहर बचाव मंचाच्या व व कर्मयोगी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या अनुयायांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या कृषी क्षेत्राशी निगडित कार्यावर मान्यवरांच्या वतीने प्रकाश टाकण्यात आला. त्यांनी हरितक्रांतीचे जनक म्हणून संपूर्ण जगात त्यांच्या कृषी व शेतकरी हिताच्या कार्यातून ओळख निर्माण केली. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र आज सुजलाम सुफलाम व स्वयंपूर्ण झाला आहे. त्यांची दूरदृष्टी हे महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे धोतक आहे.

यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्व मान्यवरांनी वर्तमान तसेच पुढील काळामध्ये माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या विचारांवर वाटचाल करत त्यांनी दाखवलेल्या मार्गाने पावलावर पाऊल ठेवून महाराष्ट्राला कृषी व



औद्योगिक विकासाच्या माध्यमातुन प्रगतीपथावर नेण्यात यशस्वी होऊ असा ठाम विश्वास व्यक्त केला. कृषी क्रांती जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने, डी.जी. तांदळे सर, नितीन जायभाये, ड.अनिल बारगजे, मा.भूषण पवार, मीनाक्षी देवकते, लताताई राऊत, चित्रपट अभिनेते ड.महेश कुमार वनवे, बाजीराव ढाकणे, अमोल अंकुटे, कॉंग्रेस पक्षाचे गणेश बजगुडे, रामधन जमाले, गवते सर, अशोक लोढा, मयुरी ताई ढाकणे, जिव्हाळा बेघर केंद्राचे राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य, बालाजी जगतकर, डॉ. संजय तांदळे, बंजारा क्रां. दल रा.म.सचिव शरद राठोड, कॅप्टन जे.डी. चव्हाण, जि.प सभापती बाबुराव जाधव, विलास राठोड, अंकुश राठोड, परमेश्वर जाधव, सरपंच भाऊसाहेब राठोड, शरद राठोड, प्रभाकर राठोड, राजेश राठोड, अभय चव्हाण, विजय चव्हाण, अशोक चव्हाण, प्रीत कुकडेजा, अशोक लोढा, डझ्झख पार्टीचे आबिदभाई सय्यद, अशोक वाघमारे आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

### ३३ वर्षांची निष्ठावान सेवा, ४३ पदकांनी सन्मानित, समाजाभिमुखतेचा आदर्श

# भाऊ म्हणून ओळखले जाणारे पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे सेवानिवृत्त

बीड । प्रतिनिधी

पोलीस खात्यात ३३ वर्षे कर्तव्यनिष्ठ, शिस्तबद्ध व समाजाभिमुख सेवा बजावलेले पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे, जे संपूर्ण विभागात भाऊ या नावाने ओळखले जात होते, हे दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने बीड पोलीस दलामार्फत आयोजित सत्कार समारंभात त्यांचा भव्य गौरव करण्यात आला. सेवाकाळात त्यांनी सिटी पोलीस स्टेशन बीड, ग्रामीण पोलीस स्टेशन बीड, नेकनूर, गेवराई, वडवणी, आणि लिंबागणेश चौकी येथे जबाबदारीने कर्तव्य बजावले. त्यांच्या प्रामाणिक सेवेसाठी त्यांना एकूण ४३ पदकांनी सन्मानित करण्यात आले, ही बाब त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे.

केवळ कायद्याची अंमलबजावणीच नव्हे तर



त्यांनी अनेक उध्वस्त संसार पुन्हा थाटले, कौटुंबिक संघर्ष मिटवले, हे कार्य केवळ पोलिसिंगपुरते मर्यादित न राहता मानवी मूल्यांची जपणूक करणारे होते. आणि जनतेच्या मनात माणुसकीचा विश्वास जागवला. म्हणूनच लोक त्यांना प्रेमाने भाऊ म्हणत. तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचीही प्रेरणादायी बाजू अशी की, त्यांची तीनही मुले यशस्वी झालेली आहेत - एक वकील, एक डॉक्टर आणि एक प्राध्यापक. ही त्यांच्या संस्कारांची आणि शिक्षणातील मूल्यमापनाचीच फलश्रुती आहे. सेवानिवृत्तीनंतर श्री. वाघमारे हे सामाजिक कार्यात सक्रिय राहणार असून, समाजासाठी आपले योगदान देत राहण्याचा त्यांचा मानस आहे.

# बेकायदेशीररित्या अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या तीन इसमांना शिवाजीनगर पोलीसांनी केले जेरबंद



बीड । प्रतिनिधी

०१/०७/२०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धानोरा रोड, बीड या ठिकाणी पांढऱ्या रंगाची ह्युडांई दउएछ्ढ गाडी क्र. चक०५ इग १९८८ मध्ये दोन इसम अग्निशत्र ताब्यात बाळगुन घेवुन जात आहेत अशी गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना मिळालेने सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार करुन रवाना केले होते.

नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे धानोरा रोडवरील पंढरी कॉलनी समोर सापळा रचुन थांबलेले असतांना पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछ्ढ गाडी क्र. चक०५ इग १९८८ आल्याने सदर गाडी अडवुन त्यामध्ये दोन इसम १) आमोल कल्याण पवार वय २९ वर्षे रा. घोडका राजुरी ता.जि. बीड ह.मु. बार्शी नाका, (२) बाबुराव मन्मथ वैराळे वय ३३ वर्षे रा. कदमवाडी ता.जि. बीड मिळुन आले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीतइसम नामेबाबुराव मन्मथ वैराळे याच्या कमरेला एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन असलेला जु.वा.किं.५०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछ्ढ गाडी क्र. चक ०५ इग १९८८ जप्त करण्यात आली. आरोपीनां पिस्टल विक्री करनारा इसम ३) राहुल प्रकाश तुपे रा. आशा टॉकीज धानोरा रोड बीड यास त्याच्या राहते घरुन ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपी राहुल प्रकाश तुपे हा मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने बीड जिल्हातुन तडीपार असुन त्यावर तो तडीपारीच्या काळात बीड जिल्हात मिळुन आल्याने त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील आरोपी क्र.१) आमोल कल्याण पवार यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. (२) बाबुराव मन्मथ वैराळे याचे विरुध्द जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी क्र.३) राहुल प्रकाश तुपे याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्द चे गुन्हे तसेच अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, सपोनि/ संदिप दुनगहु, सपोनि/गजानन क्षिरसागर, ग्रे.पो.उप.नि./ अब्दुल खय्युम कुरेशी, पोहवा/१६६४ रविंद्र आघाव, पोना/ ४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/९०४ लिंबाजी महानोर, पोशि/५११ अभिजीत सानप, पोशि/४८५ विलास कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि /ज्ञानेश्वर धोत्रे हे करत आहेत.

# बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

## डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के. महाविद्यालयाचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.

# सुशांत खौतडच्या केज तालुक्यातील जलजिवनची चौकशी करा, अन्यथा ६ जुलै रोजी अमरण उपोषण : रोहन गलांडे

केज । प्रतिनिधी



केज तालुक्यातील विजय कंट्रक्शन मार्फत झालेल्या जलजिवन योजनेच्या कामाची यांची चौकशी करून गुत्तेदार सुशांत खौतड यांच्या वर कार्यवाही करण्यात यावी. तालुक्यात झालेल्या कामाची चौकशी केल्याशिवाय पुढील कामाची रक्कम अदा करू येऊ नये. अन्यथा, ०६ जुलै २०२५ रोजी अमरण उपोषणाला बसणार असल्याचे निवेदनाद्वारे म्हटले आहे.

केज तालुक्यातील जलजिवन योजनेच्या माध्यमातून विजय कंट्रक्शन मार्फत झालेल्या जलजिवन योजनेच्या कामाची चौकशी तत्काळ करावी. उपोषणा दरम्यान मला काही झाले तर जलजिवन कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी जबाबदार राहतील व प्रशासन जबाबदार राहील, असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

# मासिक सभा अपुर्ण ठेवल्यामुळे तालखेड येथील सरपंचाविरुद्ध तक्रार दाखल

## बीडीओ यांनी चौकशी करून सरपंचावर कारवाई करावी सदस्यांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी




ग्रामपंचायत च्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी मासिक सभा घेने अनिवार्य आहे. या सभेमध्ये सर्व सदस्यांना आपले मुद्दे माडण्याचा अधिकार आहे व त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. परंतु तालखेड येथे मासिक सभा सुरू असताना सरपंच हे सदस्यांच्या विषयांवर चर्चा न करता निघून गेले त्यामुळे त्यांच्याविरूद्ध माजलगाव पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत तालखेड येथे ३० जून २०२५ रोजी मासिक सभा सुरू असताना सभेचे अध्यक्ष सरपंच यांनी एक ते दोन विषयावर चर्चा सुरु असताना सभा अपूर्ण सोडून निघून गेले. त्यामुळे बाकीच्या विषयांवर चर्चा करता आली नाही व सदस्यांना आपले विषय मांडता आले नाहीत. त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी सरपंचाची सखोल चौकशी करून कारवाई करावी असे सदस्यांनी दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे.

# सुरक्षेची हमी द्या अन्यथा, खाजगी क्लासेस बंद करा : आझाद क्रांती सेना

केज । प्रतिनिधी

खाजगी क्लासेस मध्ये मुलींवर होणाऱ्या अन्याय आत्याचार बाबत आझाद क्रांती सेनेच्या वतीने केज तहसीलदार यांना ०१ जुलै २०२५ रोजी निवेदन देण्यात आले. आझाद क्रांती सेनेचे तालुका अध्यक्ष शरद थोरात यांनी केज शहरातील कानडी रोड येथे व शहरात अन्य काही ठिकाणी बरेच खाजगी क्लासेस सुरू असून त्याठिकाणी गावकुसातील काही फिरस्ती मुलांचे टोळके शाळकरी विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक त्रास देण्याचे काम करतात. त्यामुळे तेथे दामिनी पथक व तक्रार पेठी कायमस्वरूपी तैनात असावी, त्याचप्रमाणे खाजगी क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, विद्यार्थिनींना सुरक्षेची पूर्ण हमी द्यावी, जेणेकरून या सर्व प्रकाराला कुठेतरी आळा बसेल.



बीड जिल्हयामध्ये वारंवार काही वाईट घटना घडत आहेत. त्यातल्या त्यात मुलींच्या बाबतीत केज तालुक्यामध्ये पण गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मुलींना कसल्याच प्रकारची सुरक्षितता आपल्याकडून मिळत नाही. त्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांना पोलीस यंत्रण दुर्लक्ष करताना दिसत आहे. खाजगी क्लासेसच्या बाबतीत पण हाच प्रश्न आहे. मुलींना घरातून निघाल्यापासुन घरी परत येईपर्यंत कसलीच सुरक्षितता नाही. यामध्ये ना पोलीस प्रशासन लक्ष देते ना दामिनी पथक! खाजगी क्लासेस वाले सुद्धा याकडे कानाडोळा करतात. मग आम्हाला प्रश्न पडतो की हे लोक भरमसाठी फी घेतात तरी कशाची? बीड सारख्या घटना आपल्या तालुक्यामध्ये घडू नयेत यासाठी तहसीलदारांनी स्वता: यावर उपाय योजना करावी. अन्यथा, सर्व महिला, विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन तहसील कार्यालयात मोर्चा काढण्यात येईल असा इशारा आझाद क्रांती सेनेचे तालुका अध्यक्ष शरद थोरात यांनी दिला.

यावेळी सेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामध्ये बाबुराव गालफाडे सर, इरफान मैनुद्दीन पठाण, तानाजी दुनघाव, विक्रम भीमराव पारवे, विष्णू विठ्ठल पाटूले, संतोष अंकुश लांडगे, बालाजी कराडे, रमेश पाटोळे, सचिन गालफाडे, सूर्यकांत लांडगे, लहू कसबे, सचिन शिंदे, सचिन लोखंडे, किशोर लोखंडे, प्रकाश खंडागळे, बाळासाहेब पोळ, तानाजी पोळ इत्यादी.

# आईचा शेवटचा प्रवास – रक्ताने नाही, समाजाने दिला आधार

## सोनार समाजाच्या पुढाकाराने करण्यात आला अंत्यविधी

धारूर । प्रतिनिधी

येथे पाटील गल्ली, सटवाई मंदिर परिसरात राहणाऱ्या सुरेखा सुरेश भोसले (भोसले आजी) यांचे आज सकाळी निधन झाले. त्यांना प्रकृती बिघडल्याने तातडीने धारूर येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. भोसले आजीच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे त्यांचा मुलगा असतानाही तो अंत्यविधीसाठी उपस्थित राहिला नाही, ही बाब अनेकांच्या चर्चेचा विषय बनली आहे. अशा परिस्थितीत सोनार समाजाच्या बांधवांनी पुढाकार घेत, त्यांच्या अंत्यविधीची जबाबदारी स्वीकारली.

अंत्यविधी आज दि. १ जुलै २०२५ रोजी मंगळवार, दुपारी १ वाजता पोलीस स्टेशन किल्ले धारूरच्या पाठीमागे पार पडला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अमर महामुनी व सोनार बांधव यांनी उपस्थित राहून अंत्यविधी करून श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यात धारूर नगरपालिका कार्यालयाचे सहकार्य विशेषत्वाने उल्लेखनीय राहिले. नगरपालिका चे मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे योगदान अंत्यविधीच्या व्यवस्थेत महत्वाचे ठरले.



# पाऊस लांबल्याने खरीप क्षेत्र धोक्यात

## दुबारा पेरणीच्या संकटाची चाहूल शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

आष्टी । प्रतिनिधी

जिल्ह्यात विविध ठिकाणी पावसाने मी व जूनच्या पहिल्या आठवड्यात जोरदार हजेरी लावली. या पावसावर शेतकऱ्यांनी खरीपाचे पेरणी केल्या. परंतु यंदा पाऊस वेळेवर आल्याने काहीच अडचण येणार नाही अशा सर्वांची अपेक्षा असताना सध्या विविध तालुक्यात तील भागात पावसाने पाठ फिरवणे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे पाऊस लांबल्याने खरीप क्षेत्र धोक्यात आले असून शेतकऱ्यांसमोर दुबारा पेरणीचे संकट गुंगावत आहे.

पाऊस लांबल्याने तालुक्यात अनेक शेतकऱ्यांना मात्र आता आपल्या पिकाचे चिंता पडली आहे. आष्टी तालुक्यात सुरुवातीला पाऊस झाला परंतु आता वेळेवर पाऊस आला नाही. शेतकऱ्यांनी खरीपची तयारी दमदारपणे करून बी बीयाने उपलब्ध केले. या जोरावर पावसावरचे खरीपाचे पेरणे पूर्ण केल्या आता महिना होता आला तरी काही भागात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांना धडकी भरली आहे.

# शासकीय कापुस विक्रीसाठी शेतकऱ्यांनी तयारी करावी : सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी



शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांनी २०२५-२६ या हंगामाकरीता सर्व कागदपत्रांसह तयारी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

सन २०२५-२६ या कापूस हंगामाकरीता शासनाच्या हमीदराप्रमाणे सि.सी.आयच्या वतीने शासकीय कापुस खरेदी ८११० रूपये एवढा निश्चीत करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी कापसाची ई-पिक पाहणी करणे आवश्यक आहे. सात - बारावर कापसाची नोंद असणे आवश्यक आहे. कापुस खरेदी सर्व पेमेंट आधार लिंक असलेल्या बँक खात्यात केले जाईल, त्याकरीता बँक खात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे, त्याचबरोबर आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करणे आवश्यक आहे.

पोस्टल बँकेमध्ये खाते असल्यास त्याची पैसे स्विकारण्याची मर्यादा वाढवलेली आवश्यक असुन याची सर्व तयारी करावी तसेच नंतर ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा व परेशान होण्यापेक्षा रिकाम्या वेळात कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी हे काम करून ठेवा म्हणजे आपला कापुस शासकीय कापुस खरेदी केंद्रावर घालता येईल. त्यामुळे वरिल सर्व प्रक्रिया आताच पुर्ण कराव्यात असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्सव समिती ची कार्यकारिणी जाहीर

## विविध सामाजिक उपक्रम समाजातील वंचित, गरजू आणि कष्टकरी घटकांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील : संस्थापक अध्यक्ष विनोद हातागळे

बीड । प्रतिनिधी

बलभीम नगर पेठ (बीड) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर 'अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती - २०२५' ची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, नव्या दमाच्या नेतृत्वाला संधी देत सामाजिक कामगिरीचे व्यापक रूप उभारण्याचा निर्धार या समितीने व्यक्त केला आहे.

यावेळी मार्गदर्शक डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थापक अध्यक्ष विनोद हातागळे यांच्या संकलपनेतून साजरी होत असून, यावर्षी रोगनिदान शिबीर, महिलांना साडी वाटप, रक्तदान शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, अन्नदान, वृक्षारोपण आणि शालेय साहित्य वाटप यांसारखे उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. हे सर्व उपक्रम समाजातील वंचित, गरजू आणि कष्टकरी घटकांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



बलभीम नगर येथे पार पडलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ. लक्ष्मण जाधव होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी जयंती उपक्रम सामाजिक उपयोगाचे ठरावेत याकडे लक्ष वेधले. गोरगरीब रुग्णांसाठी रोगनिदान शिबिर फायदेशीर ठरेल. यासारखे आरोग्यविषयक उपक्रम हे लोकसेवेचे खरे दर्शन आहेत, असे ते म्हणाले.या वेळी नगरसेवक विकास जोगदंड,विजेंद्र डुलगच, सतपाल लाहोट, बंडू निसर्गन्ध, नरेश पिव्हाळ, भागवत बादाडे, विजय जाधव, संदीप जाधव, प्रभाळे, कल्याण डोईजड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी नव्याने जयंती उत्सव कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

अध्यक्ष, भैय्यासाहेब मस्के, उपाध्यक्ष, दीपक राठोड, सचिव, आनंद शिंदे, सहसचिव, साहिल डुलगच, सागर कारके, कोषाध्यक्ष, विशाल धुतावळे, मारुती सोनवणे, सल्लागार, राहुल चांदणे, अमोल जाधव, निखिल जाधव, व्यवस्थापक, गणेश हातागळे, कचरू वाघमारे, अभिजीत गायकवाड तर सदस्य पदी अविनाश हातागळे, करण लांडगे, ऋषी पवार, अनिल डोंगरे, सुनील माने, अमित चांदणे, सुमित चांदणे, रामेश्वर शिरसागर, सनी हजारे, आदित्य पवार, सिद्धांत ढाकणे, गोविंद डोईजड आदींची निवड केली. या कार्यकारिणीत समाजसेवेत सक्रिय असलेल्या तरुणांचा सहभाग लक्षणीय असून ते समाज परिवर्तनासाठी प्रभावी भूमिका बजावतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या जयंती कार्यक्रमाच्या निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच, समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याची दिशा निश्चित केली जात आहे.

या प्रसंगी अमोल जाधव, जितू धनवे, लखन पिव्हाळ, सुरज धारू, सुरेश गायकवाड, अण्णा लोंढे, बाबु इनकर, शिव पिव्हाळ, गणेश परदेशी,रवि जाधव, अजय राठोड, राहुल पवार, रवि पवार, निखिल राठोड, अक्षय पवार, अरुण राठोड, राहुल पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वागताध्यक्ष स्वप्नील हातागळे यांनी केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते एक क्रांतिकारी विचारवंत होते. त्यांनी आपल्या लेखणीद्वारे समाजातील दलित, श्रमिक आणि वंचित घटकांसाठी आवाज उठवला. त्यांच्या जयंती निमित्त बीडमध्ये आयोजित करण्यात आलेले उपक्रम हे त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात सामाजिक पुनर्प्रतिष्ठा करणारे ठरतील. या उपक्रमांची व्यापकता, कार्यकारिणीतील तरुणाईचा सहभाग आणि सामाजिक बांधिलकीची भावना ही या वर्षीच्या जयंती उत्सवाची खरी ओळख ठरणार आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT